3.30
२८-४-२०२२
आ.प.

# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २८/०४/२०२२

# प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महापालिका शिक्षण विभागाने झुलेलाल हायस्कुल, उल्हासनगर-२ येथे महानगरपालिका शाळेच्या सर्व मुख्याध्यापक व शिक्षक यांचे एकदिवसीय शैक्षणिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या जिल्हा वार्षिक विकास योजनेअंतर्गत नावीन्यपूर्ण योजनेतून निधी मंजूर करण्यात आला आहे.

या नवोपक्रमाअंतर्गत महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांची व शाळेची गुणवत्ता वाढीसाठी विशेष उपक्रम हाती घेतला आहे. एनोबेल सोशल इनोव्हेशन फाउंडेशन या स्टार्टअप मार्फत सदरचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. सरद स्टार्टअप शैक्षणिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित आहे.

राजस्थान, आंध्रप्रदेश व महाराष्ट्रात तिचे उपक्रम सुरु आहेत. उल्हासनगर महानगरपालिका शाळांचे पारंपारिक सरकारी स्वरुप बदलून आधुनिक व आकर्षक शाळांमध्ये रुपांतर करण्यासाठी आयुक्तांनी पुढाकार घेतला आहे. महानगरपालिकेची एक शाळा संपूर्ण कायापालट करणे व इतर शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी वर्षभर उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

याचाच भाग म्हणून व पूर्वतयारीसाठी सर्व शिक्षकांचे उद्बोधन आज कार्यशाळेच्या माध्यमातून करण्यात आले. आजच्या कार्यक्रमात मा. डॉ. राजा दयानिधी (भा.प्र.से.), आयुक्त तथा प्रशासक, श्री. जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त, डॉ. सुभाष जाधव, उपायुक्त, श्री. भाऊराव मोहिते, प्रशासन अधिकारी व सुमारे १५० शिक्षक उपस्थित होते.

यावेळी मा. डॉ. राजा दयानिधी (भा.प्र.से.), आयुक्त तथा प्रशासक यांनी शिक्षकांना बहुमुल्य मार्गदर्शन केले. त्यात विद्यार्थी आपल्या जीवनातील एकूण कृतीशील जीवनाचा २०% कालावधी शिक्षण घेण्यासाठी व्यतीत करतो. तरीही अनेकांना शिक्षणातून अपेक्षित मूलभूत क्षमता विकसित होत नाहीत. त्या क्षमता व कौशल्ये आत्मसात करण्यासाठी शिक्षकांच्या कृतीशील अध्यापनाची गरज त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व्यतित केलेल्या वेळेचा परतावा देण्याचा प्रयत्न करावा असेही त्यांनी आवाहन केले. तसेच येत्या शैक्षणिक कालावधीत इनोबल संस्था पालक, शिक्षक यांच्या सहयोगाने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी वर्षभर प्रयत्न करणार आहेत. तसेच सदरील संस्थांमार्फत एका शाळेचे भौतिक सुविधा वाढवून आदर्श शाळा निर्माण करण्याचा मानस व्यक्त केला. एनोबल संस्थेचे संस्थापक श्री. चिराग भंडारी व त्यांच्या सहका-यांनी सर्व शिक्षकांना येत्या शैक्षणिक वर्षापासून काय-काय करायचे याचे सुक्ष्म नियोजन व त्यासाठी आवश्यक विषयांची माहिती दृकश्राव्य माध्यमातून दिली. जून २०२२ पासून उल्हासनगर महानगरपालिकेत हा उपक्रम हाती घेण्यात येणार आहे.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका